**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२४२/२०२५.**

**सुकेडे आदमखा वि. राधेश्याम.**

**नि.क्र.४.**

**फिर्यादीचा कलम २२३ बी.एन.एस.एस. प्रमाणे सत्यापण पडताळणीचा जबाब.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

माझे नाव – सुकेडे आदमखा उर्फ आजमखा अहेमद खा.

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,

राहणार – अजिंठा, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद.

दि.१९.०६.२०२५ रोजी सकाळी ०६.३० वाजेच्या सुमारास राधेश्याम प्रकाश झलवार हा शिवना रस्त्यावरील महानुभव मंदिराच्या बाजुला आला होता. त्यावेळी त्याने माझ्याकडे पैशांची मागणी केली होती व मला जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यावेळी मी त्याला माझ्याकडे पैसे नाही असे सांगितले असता त्याने मला तो पत्रकार असल्याची धमकी दिली होती. त्यावेळी त्याने मला शिवीगाळ केली होती. त्यावेळी तेथे इकबाल कासम तडवी हा आला व त्याने भांडण सोडवले होते. त्यानंतर मी अजिंठा पोलीस ठाण्यात गेले असता पोलीसांनी एन.सी. नोंदवली व मला न्यायालयात जाण्यास सांगितले होते. मला या व्यतिरिक्त अन्य काहीही सांगावयाचे नाही.

-------------.

साक्षीदाराची स्वाक्षरी.

**समक्ष,**

१५/१०/२५

**(ए. एच. तड्डु.)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.३, सिल्लोड.

दिनांक – १५.१०.२०२५.

सिल्लोड.